0 7 DEC 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# दीक्षांत समारंभ १८ डिसेंबरला

## शिवाजी विद्यापीठ : डॉ. मंथा प्रमुख पाहुणे; राज्यपाल बैसही येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ येत्या १८ डिसेंबर रोजी होणार असून, या समारंभाला यंदा राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (ए.आय.सी.टी.ई.) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी बुधवारी येथे दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल प्रत्यक्ष उपस्थित राहणार होते, परंतु यावेळी ते येऊ शकले नव्हते. दरम्यान, या सोहळ्यात ४९,४३८ पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. डॉ. शंकर मंथा यांनी त्यांच्या ४० वर्षांच्या कारकिर्दीत शैक्षणिक व नागरी प्रशासन क्षेत्रातील अनेक सन्मानाची पदे भूषविली आहेत. मुंबईच्या व्ही.जे.टी.आय. संस्थेमध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व कंट्रोल थिअरी या विषयांचे प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले आहे. त्याखेरीज, आय.बी.एम., पॉकिप्सी (न्यूयॉर्क) या अमेरिकन कंपन्यांमध्येही त्यांनी काम केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांतून त्यांचे २८० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या नावावर तीन पुस्तकेही आहेत.




रमेश बैस



डॉ. एस. एस. मंथा

'नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क' (एनएसक्यूएफ) आणि 'ब्लेंडेड लर्निंग' नियमावलीचे ते उद्गाते आहेत. याशिवाय कर्नाटक स्कील डेव्हलपमेंट ऑथोरिटीचे सदस्य आणि आंध्र प्रदेश सरकारचे सल्लागारही ते आहेत. एसएनडीटी महिला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आणि के.एल. विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांनी काम केले आहे. सध्या ते 'महाप्रीत स्टार्टअप नॉलेज सेंटर'चे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एडव्हान्स्ड स्टडीज, बेंगलोर या संस्थेत ॲडजंक्ट प्राध्यापक, नॅशनल सायबर सेफ्टी अँड सिक्युरिटी स्टॅंडर्ड्स (एनसीएसएसएस) संस्थेच्या तांत्रिक समितीचे चेअरमन आणि महाराष्ट्र शासनासाठी माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ म्हणून काम पाहात आहेत.



### यंदा पदवी घेणाऱ्यांमध्ये मुलींची सख्या लक्षणीय

- या समारंभात ४९,४३८ पदव्या प्रदान करण्यात येणार असून, यंदा पदवी ग्रहण करणाऱ्यांमध्ये मुलींची संख्या २७,४७५ इतकी लक्षणीय आहे, अशीही माहिती कुलगुरू डॉ. शिर्के यांनी दिली. गतवर्षीही पदवी घेणाऱ्यांमध्ये मुलींची संख्या लक्षणीय होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 DEC 2023
पुढारी

# दीक्षान्त समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मंथा उपस्थित राहणार

शिवाजी विद्यापीठातून

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



डॉ. एस.एस. मंथा

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षान्त समारंभ सोमवार, दि. १८ डिसेंबर रोजी होणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (ए.आय.सी.टी.ई.) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस तसेच उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख अतिथी राहणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.

डॉ. एस. एस. मंथा यांनी मुंबईच्या व्ही. जे. टी. आय. संस्थेमध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व कंट्रोल थिअरी या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्याखेरीज, आय.बी.एम., पॉकिप्सी (न्यूयॉर्क) या अमेरिकन कंपन्यांमध्येही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांतून त्यांचे २८० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. त्यांनी तीन पुस्तकेही लिहिली आहेत. 'नॅशनल स्किल क्वालिफिकेशन फ्रेमवर्क' (एनएसक्यूएफ) आणि 'ब्लेंडेड लर्निंग' नियमावलीचे ते उद्गाते आहेत. कर्नाटक स्किल डेव्हलपमेंट ऑथोरिटीचे ते सदस्य आहेत आणि आंध्र प्रदेश सरकारचे सल्लागारही आहेत. एसएनडीटी महिला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आणि के. एल. विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांनी काम केले आहे. सध्या ते 'महाप्रीत स्टार्टअप नॉलेज सेंटर' चे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एडव्हान्स्ड स्टडीज्, बेंगलोर या संस्थेत अॅडजंक्ट प्राध्यापक, नॅशनल सायबर सेफ्टी अँड सिक्युरिटी स्टँडडर्स (एनसीएसएसएस) संस्थेच्या तांत्रिक समितीचे चेअरमन आणि महाराष्ट्र शासनासाठी माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ म्हणून काम पाहत आहेत.

दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची संख्या ही ४९,४३८ इतकी आहे. पदवी ग्रहण करणाऱ्या स्नातकांत मुलींची संख्या २७,४७५ इतकी आहे.

0 7 DEC 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा १८ रोजी दीक्षान्त समारंभ

## डॉ. एस. एस. मंथा प्रमुख पाहुणे

**। कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६०वा दीक्षान्त समारंभ १८ डिसेंबर रोजी होणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस तर, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख अतिथी असतील, ही माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी दिली.



डॉ. मंथा

## ४९ हजार ४३८ पदवी प्रमाणपत्रे

या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची संख्या ही ४९ हजार ४३८ आहे. यंदा पदवी ग्रहण करणाऱ्या स्नातकांत मुलींची संख्या २७ हजार ४७५ इतकी लक्षणीय आहे, हे सांगताना मला आनंद होतो आहे. अशी भावना कुलगुरू डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

डॉ. शंकर एस. मंथा यांनी मुंबईच्या व्हीजेटीआय संस्थेमध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व कंट्रोल थिअरी या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. तीन पुस्तकेही त्यांनी लिहीली आहेत. 'नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क' (एनएसक्यूएफ) आणि 'ब्लेंडेड लर्निंग' नियमावलीचे ते उद्गाते आहेत. कर्नाटक स्कील डेव्हलपमेंट ऑथोरिटीचे ते सदस्य आहेत आणि आंध्र प्रदेश सरकारचे सल्लागारही आहेत.

एसएनडीटी महिला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, के. एल. विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांनी काम केले आहे. सध्या ते 'महाप्रीत स्टार्टअप नॉलेज सेंटर'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ अॅडव्हान्स्ड स्टडीज्, बंगळुरू या संस्थेत अॅडजंक्ट प्राध्यापक, नॅशनल सायबर सेफ्टी अँड सिक्युरिटी स्टँडर्ड्स (एनसीएसएसएस) संस्थेच्या तांत्रिक समितीचे चेअरमन आणि महाराष्ट्र शासनासाठी माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ म्हणून ते काम पाहात आहेत.

जनसंपर्क कक्ष
07 DEC 2023 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. मंथा

## राज्यपाल अध्यक्षस्थानी ; ४९ हजार प्रमाणपत्रे देणार

▶सकाळ वृत्तसेवा



डॉ. मंथा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. शंकर तथा एस. एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी राज्यपाल डॉ. रमेश बैस, तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील हे प्रमुख अतिथी असणार आहेत, अशी माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आज येथे दिली.

डॉ. मंथा यांनी त्यांच्या सुमारे ४० वर्षांच्या कारकीर्दीत शैक्षणिक व नागरी प्रशासन क्षेत्रातील अनेक सन्मानाची पदे भूषविली आहेत. त्यांनी मुंबईच्या व्ही. जे.टी.आय. संस्थेमध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व कंट्रोल थिअरी या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्याखेरीज, आय.बी.एम., पॉकिप्सी (न्यूयॉर्क) या अमेरिकन कंपन्यांमध्येही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांतून त्यांचे २८० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क आणि ब्लेंडेड लर्निंग नियमावलीचे ते उद्गाते आहेत. सध्या ते महाप्रीत स्टार्टअप नॉलेज सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नॅशनल सायबर सेफ्टी अँड सिक्युरिटी स्टँडर्ड्स संस्थेच्या तांत्रिक समितीचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र शासनासाठी माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ म्हणून ते काम पाहात आहेत.



### यंदाही मुलींची संख्या अधिक

विद्यापीठात १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या दीक्षान्त समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची संख्या ४९,४३८ इतकी आहे. यंदा पदवी ग्रहण करणाऱ्या स्नातकांत मुलींची संख्या २७,४७५ इतकी लक्षणीय आहे.

0 7 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डीएसटी केंद्राच्या माध्यमातून राष्ट्राचा शाश्वत विकास

## मुंबई आयसीटीचे प्रा. बी. एन. थोरात यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाने आयोजित केलेल्या नॅशनल कॉन्फरन्स दरम्यान मुंबई आयसीटीचे प्रा. बी. एन. थोरात यांनी विद्यापीठातील सैफ-डीएसटी केंद्राला भेट दिली. या केंद्राच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रांचा शाश्वत विकास होईल. म्हणून अशा प्रकारची अत्याधुनिक विश्लेषणात्मक साधने प्राध्यापक आणि संशोधकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरतात, असे मत प्रा. थोरात यांनी व्यक्त केले.



कोल्हापूर : एक्सपीएस उपकरणाची पाहणी करताना प्रा. बी. एन. थोरात, डॉ. आर. जी. सोनकवडे.

प्रा. थोरात म्हणाले, सैफ-डीएसटी सुविधांची कक्षा प्रयोगशाळांपर्यंत मर्यादित न ठेवता औद्योगिक संशोधनासाठी विस्तारली जाणे गरजेचे आहे. अशा उपयुक्त सुविधा . विविध उद्योगांमध्ये स्टार्टअप प्रोग्रामद्वारे स्थापित करण्याची गरज आहे. भारत एक जागतिक पॉवरहाऊस म्हणून पुन्हा उदयास येत आहे. जवळजवळ चार ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था असणारा भारत अमेरिका, चीन नंतर लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून पुढे येईल. भारताची खरी क्षमता ही मौल्यवान संसाधने, मानवी भांडवल आणि उत्कृष्ट लोकसंख्याशास्त्रीय लाभांश स्टार्टअप इकोसिस्टममध्ये रूपांतरित करण्यात आहे. विविध क्षेत्रांमध्ये भरपूर संधी आहेत ज्यात आमचे तरुण आणि वृद्ध नेटिझन्स प्रयत्न करून यशस्वी उद्योजक होऊ शकतात. रोजगाराचा मोठा समूह निर्माण करण्यासाठी आणि दोनशे दशलक्षाहून अधिक नोकरी शोधणाऱ्यांसाठी उपजीविका निर्माण करण्यासाठी, भारताला काही लाखांहून अधिक उद्योजकांची गरज आहे. अशा परिस्थितीत उद्योग उभे करण्यात संशोधन आणि विकासाचा मोठा वाटा आहे. त्यामुळे अशा प्रकारची अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरणे संशोधकांना आणि उद्योगांना इतक्या सहजतेने उपलब्ध होणे ही खूप महत्वपूर्ण गोष्ट आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या पाठिंब्यामुळे आणि प्रोत्साहनामुळेच हे सर्व शक्य होत आहे, असे डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी सांगितले.

07 DEC 2023 तरुण भारत. जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सेट-नेट परीक्षेला सामोरे जाताना आत्मविश्वास महत्वाचा

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ डॉ. कृष्णा पाटील यांचे मत

विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत घेण्यात येणारी नेट परीक्षा सुरु होत असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जाताना आत्मविश्वास महत्वाचा आहे, असे मत दूरशिक्षण व ऑनलाइन सिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. कृष्णा पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने सेट नेट कार्यशाळेत 'सेट नेट परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर ऑनलाईन पध्दतीने ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. डी. के. मोरे उपस्थित होते.

डॉ. पाटील म्हणाले, सेट नेट परीक्षेसाठी यशाची पंचसूत्री आहे. अभ्यासक्रमाचे सुयोग्य आकलन पाहिजे. व्यापक व पुरेशा सातत्य पूर्ण सराव असणे महत्वाचे आहे. सुस्पष्ट व पुरेसे मार्गदर्शन घेणे महत्वाचे आहे. त्यासाठी योग्य संदर्भ ग्रंथांची निवड करता आली पाहिजे आणि प्रश्नपत्रिकेचे यथार्थ आकलन असले पाहिजे. सरावातील सातत्यच विद्यार्थ्यांना सेट नेट परीक्षेसाठी महत्वाचे आहे. अपयशाने खचून न जाता पुन्हा अभ्यास करणे महत्वाचे आहे. त्यासाठी आत्मविश्वास महत्वाचा आहे. या परीक्षेसाठी तंत्र पद्धतीला सर्वात जास्त महत्व आहे. विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे.

डॉ. मोरे म्हणाले, कोणत्याही स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी विद्यार्थ्यांची असली पाहिजे. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी फायद्याचा आहे. इतिहास विषयावर डॉ. दत्तात्रय मचाले यांनी व इंग्रजी विषयावर डॉ. एस. बी. परिट यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी १७० हून अधिक विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. सुशांत माने यांनी करून दिली. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी केले. आभार डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

0 7 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांचे कार्य दिशादर्शक

## श्रीकृष्ण महाजन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मानवी समाजाला दिशादर्शक आहे. ज्ञानाच्या आधारावर त्यांनी केलेले कार्य संशोधनाच्या माध्यमातून पुढे येणे आवश्यक आहे. सर्वच समाज घटकांच्या उन्नतीसाठी त्यांच्याकडून झालेले कार्य नेत्रदीपक आहे', असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी आज येथे केले.

विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात विधी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेमध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे होते. डॉ. महाजन म्हणाले, 'प्राचीन भारतीय व्यापारावर आजपर्यंत कोणीही लिखाण केले नाही. ते डॉ. आंबेडकरांनी विद्यार्थीदशेत केले. ते आजही मार्गदर्शक ठरत आहे. भारतीय शेतीच्या संदर्भात त्यांचे लिखाण फार महत्त्वाचे आहे. संविधानाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या जागतिक मानवी मूल्यांवर आधारित लोकशाहीची त्रिमिती या देशाला अर्पण केली.'

डॉ. मोरे म्हणाले, 'डॉ. आंबेडकरांचे चरित्र विद्यार्थ्यांसह आपणा सर्वांसाठी खूप मार्गदर्शक आहे.' डॉ. विवेक धुपदाळे यांनी स्वागत केले. यावेळी डॉ. शोभा शेट्टी, दीपा श्रावस्ती, अनमोल कोठाडिया, प्रकाश कांबळे, अरुण शिंदे, बी.आर. इंगवले, श्रीपाद गायकवाड उपस्थित होते. राकेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. नारायण यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात आज वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी विचार मांडले.**

07 DEC 2023 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकरांकडून समाजाच्या उन्नतीचे कार्य

## शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानमालेत अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे प्रतिपादन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत बोलताना अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन. सोबत डॉ. नंदकुमार मोरे व डॉ. विवेक धुपदाळे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मानवी समाजाला दिशादर्शक आहे. ज्ञानाच्या आधारावर डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य संशोधनाच्या माध्यमातून पुढे येणे आवश्यक आहे. सर्वच समाजघटकांच्या उन्नतीसाठी बाबासाहेबांकडून झालेले कार्य नेत्रदीपक आहे, असे प्रतिपादन वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात विधी अधिविभागामार्फत आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. मराठी अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. महाजन म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वाचन आणि लेखन अव्याहतपणे चालू होते. त्यामधून प्राप्त झालेले ज्ञान मानवी समाजाच्या कल्याणासाठी व प्रगतीसाठी वापरले. बाबासाहेबांमध्ये ज्ञानाच्या आस निर्माण करण्याचे काम वडील रामजी यांनी केले. अत्यंत गरीब परिस्थिती असतानाही त्यांनी मुलांना शिकण्यासाठी पुस्तके खरेदी करून दिली आणि शिक्षणासाठी प्रोत्साहित केले.

आपल्या कुशाग्र बुध्दीमत्तेच्या जोरावर अस्पृश्य समाजामधून दहावी उत्तीर्ण होणारे बाबासाहेब पहिले विद्यार्थी होते. मुंबईमध्ये त्यांच्या अभिनंदनाची सभा घेण्यात आली होती. त्यावेळी गुरूवर्य कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांनी स्वत: लिहिलेले भगवान बुद्धाचे चरित्र बाबासाहेबांना भेट दिले. भारतीय शेतीच्या संदर्भात त्यांचे लिखाण फार महत्त्वाचे आहे. माणगावच्या परिषदेमध्ये कोल्हापूर संस्थानचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी डॉ. आंबेडकर हे देशाचे नेते होतील असे भाकीत केले होते. माणगाव आणि नागपूरच्या बहिष्कृतांच्या राष्ट्रीय परिषदेमुळे त्यांचे ऐतिहासिक नेतृत्व ज्ञानाच्या आधारावर पुढे उदयास आले. शोषित आणि वंचित घटकांना त्यांचे सामाजिक न्यायाचे हक्क मिळाले पाहिजेत, यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, डॉ. आंबेडकरांचे चरित्र वाचल्यावर समाजात शिकलेले लोक काय करतात, असा गंभीर प्रश्न आपणास पडतो. डॉ. आंबेडकरांचे चरीत्र विद्यार्थ्यांसह आपणा सर्वांसाठी मार्गदर्शक आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक क्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानामुळे डॉ. आंबेडकर पुढील हजारो वर्षे आपल्यामध्ये ज्ञानाच्या स्वरूपात अजरामर राहणार आहेत.

विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी स्वागत केले. राकेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. माजी प्राचार्य डॉ. आर. नारायणा यांनी आभार मानले. यावेळी डॉ. शोभा शेट्टी, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. अरूण शिंदे, डॉ. बी. आर. इंगवले, डॉ. श्रीपाद गायकवाड आदी उपस्थित होते.

0 7 DEC 2023
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकर यांचे कार्य समाजाला दिशादर्शक

## डॉ. श्रीकृष्ण महाजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मानवी समाजाला दिशादर्शक असून, ज्ञानाच्या आधारावर त्यांनी केलेले कार्य संशोधनाच्या माध्यमातून पुढे येणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. शिवाजी विद्यापीठ विधी अधिविभागामार्फत आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत ते बोलत होते.

डॉ. आंबेडकर यांनी शोषित आणि वंचित घटकांना त्यांचे सामाजिक न्यायाचे हक्क देण्यासाठी विशेष प्रयत्न केले. अस्पृश्यतेच्या विरुद्ध लढा उभा केला.

संविधानाच्या माध्यमातून बाबासाहेबांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या जागतिक मानवी मूल्यांवर आधारित लोकशाहीची त्रिमिती या देशाला अर्पण केली. त्यांच्या कार्यातून मानवी जीवनाच्या प्रत्येक अंगाला त्यांनी स्पर्श केल्याचे दिसून येते, असेही डॉ. महाजन म्हणाले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेत बोलताना डॉ. श्रीकृष्ण महाजन. छायाचित्रात डॉ. नंदकुमार मोरे व डॉ. विवेक धुपदाळे. (छाया : पप्पू अत्तार)**

अध्यक्षीय भाषणात डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, डॉ. आंबेडकरांचे चरित्र विद्यार्थ्यांसह आपणा सर्वांसाठी खूप मार्गदर्शक आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक क्षेत्रांमध्ये दिलेल्या योगदानामुळे पुढील हजारो वर्षे आपल्यामध्ये ज्ञानाच्या स्वरूपात अजरामर राहणार आहेत.

विधी अधिविभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे यांनी स्वागत केले. राकेश शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. आर. नारायणा यांनी आभार मानले. यावेळी डॉ. शोभा शेट्टी, डॉ. दीपा श्रावस्ती, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. अरुण शिंदे यांच्यासह विधी शाखेचे विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 DEC 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात १७ अभ्यासक्रमांच्या परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या १७ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा बुधवारी वर्णनात्मक पद्धतीने विविध महाविद्यालये व अधिविभागामध्ये सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी एकूण ४७४८ विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने एम.ए. होम सायन्स सेमिस्टर तीन, एम.ए. संस्कृत सेमिस्टर एक आणि तीन अभ्यासक्रमाचा निकाल घोषित केला. आजअखेर १२८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२३ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकाकडून तिन्ही जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा झालेली नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 DEC 2023
पुण्यनगरी

# महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसवर डॉ. नवनाथ कुंभार यांचे नामांकन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनजमेंट, जीवरसायन शास्त्र अधिविभागातील सहायक प्राध्यापक डॉ. नवनाथ कुंभार यांना महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस यांच्याकडून 'यंग असोसिएटस्' म्हणून नामांकन प्राप्त झाले आहे. डॉ. कुंभार हे कर्करोग या रोगावर जीवरसायनशास्त्र अधिविभागात संशोधन करत आहेत. डॉ. कुंभार यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकेमध्ये ३५ हून अधिक शोधनिबंध प्रकशित आहेत. तसेच त्यांनी कर्करोग व स्ट्रव्हाईट-सुपर कपॅसिटर या संशोधनावर २ पेटंट दाखल केले आहेत. डॉ. कुंभार यांना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनावणे, डॉ. राजेश गच्चे यांचे मार्गदर्शन लाभले.



जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 DEC 2023
सकाळ

# प्रा. प्रशांत अनभुले यांना 'महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ सायन्सेस'चे नामांकन



प्रा. प्रशांत अनभुले

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले यांना महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस यांचे नामांकन मिळाले आहे. प्रा. अनभुले हे रसायनशास्त्र विभागात २००२ पासून कार्यरत असून ते सेंद्रिय रसायनशास्त्रात संशोधन करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत १६ विद्यार्थ्यांना पीएचडी प्राप्त झाली आहे. त्यांचे विविध नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालकामध्ये १३० हून अधिक पब्लिकेशन्स प्रकाशित आहेत. त्यांना एक पेटंट मिळाले आहे. ते रसायनशास्त्र अधिविभागात अप्लाइड केमिस्ट्री या विषयाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. या नामांकनाबद्दल कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे आदींनी त्यांचे अभिनंदन केले. या नामांकनाबाबतचे यश माझ्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांना समर्पित करत आहे, त्यांच्या कष्टाचे हे फळ असल्याची प्रतिक्रिया डॉ. अनभुले यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 DEC 2023
तरुण भारत

# अनुष्का पाटीलची अ. भा. आंतर विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड



**कोल्हापूर : नेमबाज अनुष्काचे अभिनंदन करताना मान्यवर.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

आंतरराष्ट्रीय नेमबाज अनुष्का पाटील हिची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ही स्पर्धा शुक्रवार दि.०८ ते ११ डिसेंबर या कालावधीत नवी दिल्ली येथे होणार आहेत. शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय नेमबाजी स्पर्धेमध्ये अनुष्काने १० मीटर पिस्तल व २५ मीटर स्पोर्ट्स पिस्तल या दोन्ही गटात वर्चस्व मिळवत प्रथम क्रमांक पटकाविला होता. ती कमला कॉलेज कोल्हापूर येथे एम. ए. योगशास्त्रच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे.

आतापर्यंत अनुष्काने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक पदके मिळवली आहेत. डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, माजी शारीरिक शिक्षण संचालिका योगतज्ञ डॉ. सुनिता काळे, कॉलेजच्या शारीरिक शिक्षण संचालिका श्रीमती ज्योती लेंगरे यांचे मार्गदर्शन लाभले.

07 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभ १८ डिसेंबर रोजी

## एआयसीटीईचे माजी चेअरमन डॉ. एस.एस. मंथा प्रमुख पाहुणे तर अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस


प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवार १८ रोजी होणार आहे. दीक्षान्त समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (ए.आय.सी.टी.ई.) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. तर अध्यक्षस्थान राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस भूषवणार आहेत. तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

डॉ. एस. एस. मंथा यांनी त्यांच्या सुमारे ४० वर्षांच्या कारकीर्दीत शैक्षणिक व नागरी प्रशासन क्षेत्रातील अनेक सन्मानाची पदे भूषविली आहेत. त्यांनी



मुंबईच्या व्ही. जे. टी. आय. संस्थेमध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व कंट्रोल थिअरी या विषयांचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्याखेरीज, आय. बी. एम., पॉकिप्सी (न्यूयॉर्क) या अमेरिकन कंपन्यांमध्येही त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकांमधून त्यांचे २८० हून अधिक शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. अनेक परिषदांमध्ये त्यांनी शोधनिबंध सादर केले आहेत, बीजभाषणे दिली आहेत. तीन पुस्तकेही प्रकाशित झाली आहेत. 'नॅशनल स्कील क्वालिफिकेशन फ्रेमवर्क' (एनएसक्यूएफ) आणि 'ब्लेंडेड लर्निंग'



दीक्षांत समारंभात ४९ हजार ४३८ पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. यंदा पदवी ग्रहण करणाऱ्या स्नातकात २७ हजार ४७५ मुली आहेत.

नियमावलीचे ते उद्गाते आहेत. कर्नाटक स्कील डेव्हलपमेंट ऑथोरिटीचे ते सदस्य आहेत आणि आंध्रप्रदेश सरकारचे सल्लागारही आहेत. एसएनडीटी महिला विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आणि के. एल. विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांनी काम केले आहे. सध्या ते 'महाप्रीत स्टार्टअप नॉलेज सेंटर'चे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एडव्हान्स्ड स्टडीज्, बेंगलोर या संस्थेत अॅडजंक्ट प्राध्यापक, नॅशनल सायबर सेफ्टी अँड सिक्युरिटी स्टॅंडर्ड्स (एनसीएसएसएस) संस्थेच्या तांत्रिक समितीचे चेअरमन आणि महाराष्ट्र शासनासाठी माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ म्हणून काम पाहत आहेत.